CNR No. MHSO060004602025

दाखल दिनांक – ०९/०४/२०२५
नोंदणी दिनांक – ०९/०४/२०२५
निकाल दिनांक – २७/०३/२०२६
कालावधी – ११ महिने, १८ दिवस.

## २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर पंढरपूर, यांच्या न्यायालयात

### (पिठासीन अधिकारी श्रीमती. एम. बी. कुलकर्णी)

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १४/२०२५ नि. क्र.२८

१. **संदेश सुरेश भोसले.**
वय २१ वर्षे, धंदा – शेती,

२. **सुदेश सुरेश भोसले.**
वय २० वर्षे, धंदा – शेती,

३. **शोभा सुरेश भोसले.**
वय ३८ वर्षे, धंदा – घरकाम,

४. **भामाबाई गोविंद भोसले.**
वय ७४ वर्षे, धंदा – काही नाही, **अर्जदार**
नं. १ ते ४ रा. मारोळी,
ता. मंगळवेढा, जि. सोलापूर.

५. **सुवर्णा जोतिराम निकम.**
वय ४१ वर्षे, धंदा – घरकाम,
रा. भोसे, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर.

६. **संगिता अशोक सुर्यवंशी.**
वय ५० वर्षे, धंदा – घरकाम,
रा. गुड्डापूर, ता. जत, जि. सांगली.

**विरुध्द**

महाराष्ट्र सरकार **सामनेवाला**

---

**भारतीय वारसा कायद्याचे कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला मिळणेकरीताचा अर्ज**

---

अर्जदार तर्फे विधिज्ञ – श्री. एम. डी. गायकवाड.

सामनेवाला तर्फे विधिज्ञ – एकतर्फा.

---

**न्यायनिर्णय**

**(घोषित दिनांक २७/०३/२०२६)**

अर्जदाराने भारतीय वारसा कायद्याचे कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला मिळणेकरीताचा अर्ज सादर केला आहे.

०२] **अर्जदाराची हकीकत थोडक्यात असे की,**

अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ यांचे आजोबा गोविंद बाबू भोसले हे दि.२५.०५.२०१८ रोजी मयत झाले. अर्जदार क्र.४ ही मयत गोविंद यांची पत्नी असून अर्जदार क्र. १ व २ हे मयत मुलगा सुरेश यांची मुले व अर्जदार क्र. ३ ही त्यांची सून असून अर्जदार क्र.५ व ६ ह्या मुली आहेत. अर्जदार यांचेशिवाय त्यांना इतर कोणही वारस नाही.

०३] सहदेव शिवाजी मोरे यांच्या नांवावर खालील नमूद रकमा जमा असून त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १. | बॅंक ऑफ इंडिया, शाखा जाडर बोबलाद, ता. जत, जि. सांगली खाते क्र. १६०५१०१००००३४३० | १३,३३,२७४/- |
| २. | विदर्भ कोकण ग्रामीण बॅंक शाखा सलगर बु ता. मंगळवेढा, जि. सोलापूर खाते क्र. २०२३१०१००००४०९९ | १७,४५,४१०/- |

| | | |
|---|---|---|
| ३. | विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा सलगर बु ता. मंगळवेढा, जि. सोलापूर खाते क्र. २०२३४५११००००३८० | ९,७८,८८८/- |
| ४. | विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा सलगर बु ता. मंगळवेढा, जि. सोलापूर खाते क्र. २०२३४५११००००३८१ | ९,८१,७५१/- |
| ५. | विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा सलगर बु खाते क्र. २०२३४५११००००३८२ | ९,८१,७९६/- |
| ६. | विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा सलगर बु ता. मंगळवेढा, जि. सोलापूर खाते क्र. २०२३४५११००००६३९ | ५,६२,०३६/- |
| ७. | विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा सलगर बु ता. मंगळवेढा, जि. सोलापूर खाते क्र. २०२३४५११००००६४० | ५,६२,०१६/- |

०४] दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता माझ्यासमोर पुढील मुद्दे उपस्थित होतात त्यावरील असणारे निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र** | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १] | अर्जदार हे मयत गोविंद बाबू भोसले यांचे कायदेशीर वारस असल्याचे सिद्ध करतात काय ? | होय. |
| २] | अर्जदार हे भारतीय वारसा कायद्याचे कलम ३७२ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी पात्र आहेत काय ? | होय. |
| ३] | अंतिम आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

०५] चौकशीकामी अर्जदार क्र.१ यांनी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.०९** ला, **नि.क्र.१०** वर बँक ऑफ इंडिया शाखा जाडर बोबलाद, ता. जत यांचेकडील स्टेटमेंट, **नि.क्र.११ ते १६** वर विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा सलगर बु. ता. मंगळवेढा यांचेकडील स्टेटमेंट, **नि.क्र. १७** वर सुरेश गोविंद भोसले यांचे मृत्यू प्रमाणपत्र, **नि.क्र. १८** वर गोविंद बाबु भोसले यांचे मृत्यू प्रमाणपत्र, **नि.क्र.१९ ते नि.क्र.२५** आधारकार्डच्या पडताळलेल्या प्रती, **नि.क्र.१०** वर दैनिक दामाजी एक्सप्रेस मधील दि.१२.०७.२०२५ रोजीचा अंक व इतर कागदपत्रे दाखल केलेले आहे. अर्जदारांनी पुरावा संपल्याची पुरसिस **नि.क्र.२७** ला दाखल केली आहे.

### मुददा क्रं. १ व २ करिता –

०६] साक्षीदार क्रं.१ ते ४ यांनी आपआपल्या सरतपासणीची प्रतिज्ञापत्रे दाखल करुन अर्जातील कथने नमूद केली आहेत.

०७] उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मयत गोविंद हे दि.२५.०५.२०१८ रोजी मयत झाले आहेत. मयत गोविंद हे अर्जदार क्र.१ व २ यांचे आजोबा व मयत मुलगा सुरेश यांचे वडिल आहेत. अर्जदार क्र. ३ ही त्यांची सून असून अर्जदार क्र.४ ही त्यांची पत्नी आहे व अर्जदार क्र. ५ व ६ हया मुली आहेत. त्यामुळे अर्जदार हेच मयत गोविंद यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांनी कायदेशीर वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात यावे असे कथन केले आहे. याशिवाय दिनांक १९.१०.२०२५ रोजी दैनिक दामाजी एक्सप्रेस या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन प्रसिध्द होऊन व जाहिरनामा प्रसिध्द करुन सुध्दा उपलब्ध कालावधीमध्ये कोणीही आक्षेप नोंदवला नाही.

०८] एकंदरीत उपलब्ध तोंडी आणि कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन करता अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जास कोणीही आक्षेप नोंदवला नाही. त्यामुळे अर्जदार हे मयत गोविंद यांचे कायदेशीर वारस आहे. त्यामुळे वारसा प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यास ते पात्र आहेत. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ ते ६ यांना मयत गोविंद बाबू भोसले यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत प्रमाणपत्र अर्जदार यांच्याकडून योग्य ती कोर्ट फी भरुन घेऊन देण्यात यावे.

३. सदर प्रमाणपत्र स्वतः कोणत्याही मालमत्तेत कोणतेही हक्क किंवा शिर्षक निर्माण करीत नाही.

(न्यायासनावर निवेदीत आणि अधीघोषीत)

KULKARNI MANISHA BABURAO

Digitally signed by KULKARNI MANISHA BABURAO
Date: 2026.03.27 16:12:45 +0530

दि.२७/०३/२०२६. **(एम. बी. कुलकर्णी)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,

पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | V. G. Shirsikar (Grade-II) (In-charge) |
| Court | - | 2nd Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 27.03.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 27.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 27.03.2026 |